Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# चंद्रपूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा चिकित्सक अभ्यास

**लोमेश ज्ञा. बावनकुळे**
शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली

**डॉ. राकेश पी. करोडकर**
शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली

---

## प्रस्तावना :

गेल्या अनेक वर्षापासून ग्रामीण भाग चूल विरहित करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. अनेक प्रकारच्या चुलींच्या रचना वापरात आल्या आणि गेल्याही. परिस्थिती मात्र, आहे तशीच राहिली. चुलीतील धुरामुळे महिलांना त्रास होतो आणि त्यामुळे त्या विविध आजारांना बळी पडतात. स्वयंपाक करताना घराच्या आतल्या आतच खेळत राहणाऱ्या या धुरामुळे स्त्रिया व त्यांच्या आसपास बागडत असलेली लहान बालके रोगग्रस्त होऊ शकतात. थोडक्यात काय तर ग्रामीण व निमशहरी भागात सर्वसाधारणपणे स्वयंपाक करण्यासाठी आजही अनेक गावांत चुलीचा वापर केला जातो. ग्रामीण भागातील स्त्रिया पारंपरिक चुलीत जळणाऱ्या इंधनामुळे होणाऱ्या प्रदूषणाचा बळी ठरत आहेत. यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी 'स्वच्छ इंधन, बेहतर जीवन' असा नारा देऊन केंद्र सरकारने १ मे २०१६ रोजी संपूर्ण भारतात प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा शुभारंभ केला. या योजनेचा मूळ उद्देश भारतातील दारिद्र्य रेषेखालील सुमारे ५ कोटी महिलांना मोफत घरगुती एल.पी.जी. गॅस जोडण्या देण्याचा केंद्र शासनाने संकल्प केला होता.

या योजनेवर आतापर्यंत झालेले संशोधन हे फक्त आर्थिक व सामाजिक पैलूतूनच झालेले असून फक्त लोकांच्या आर्थिक परिस्थितीवरून या योजनेला अपयशी ठरविण्याचा अट्टाहासही करण्यात आला. परंतु संबंधित योजनेत मांडण्यात आलेल्या बाबींचे अध्ययन केल्यास ही योजना स्त्री सक्षमीकरणासाठी अतिशय लाभदायक ठरू शकते. यावरून ही योजना स्त्री हक्कांची प्रतिष्ठा निर्माण करणारी आहे. वरील माहितीच्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनात चंद्रपूर जिल्ह्यातील उज्ज्वला योजना व लाभार्थी महिलांची या योजनेसंदर्भातील स्थिती याचे अध्यन करण्याचा प्रयत्न केला आहे.

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत अभ्यासाकरिता आवश्यक ती प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही स्वरूपाची माहिती संकलित करण्यात आली आहे. सर्वप्रथम दुय्यम स्वरूपाची विविध सांख्यिकीय माहिती गोळा करण्यात आली. प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला. जिल्ह्यातील प्रत्येक लाभार्थ्यांना भेट देणे शक्य नव्हते म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी साध्या यादृच्छिक

(लॉटरी) पद्धतीने नमुना निवडण्यात आला व निवडलेल्या लाभार्थ्यांना भेटून माहिती गोळा करण्यात आली. चंद्रपूर जिल्ह्यांतर्गत १५ तालुके आहेत. उज्ज्वला योजनेंतर्गत नावे नोंदविलेल्या लाभार्थ्यांची संख्या जास्त असल्यामुळे प्रत्येक तालुक्यातून ५० लाभार्थ्यांचा म्हणजे एकुण ७५० लाभार्थ्यांना नमुना म्हणुन निवडण्यात आले.

संशोधन अध्ययन करण्याचा दृष्टीकोनातून चंद्रपूर जिल्ह्यातील लाभार्थीपैकी नमुना निवडीत एकक म्हणून ज्यांना स्थान देण्यात आले त्यांच्याकरिता मुलाखत अनुसूची विकसित करून घेण्यात आली व तथ्य संकलन सर्वेक्षणाच्या माध्यमातुन करण्यात आले. संकलित केलेज्या तथ्यांचे योग्यरित्या वर्गीकरण करण्यात आले व त्यांना सारणीबद्ध करून सांख्यिकीय पद्धतीचा वापर करून विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले.

## माहितीचे विश्लेषण

### १. लाभार्थ्यांची जात वर्गवारी :

**सारणी क्रमांक १:** प्रतिसादकर्त्यांचे लाभार्थी गटानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी

| लाभार्थी गट | लाभार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अनुसूचित जाती | १२७ | १६.९ |
| अनुसूचित जमाती | २८६ | ३८.१ |
| प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) | ९५ | १२.७ |
| अति मागासवर्गीय (एमबीसी) | ७९ | १०.५ |
| अंत्योदय अन्न योजना (एएवाय) | ५७ | ७.६ |
| वनवासी | ६३ | ८.४ |
| गरीब कुटुंबांतर्गत नोंदणी केलेले | ४३ | ५.७ |
| **एकूण** | **७५०** | **१००.०** |

काई–वर्गमूल्य: ३९१.१; स्वातंत्र्यांश: ६; तालिका मूल्य: १२.५९; p मूल्य: <०.०५

**सारणी क्रमांक १** मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा लाभ घेतलेल्या व्यक्तिंचे लाभार्थी गटानुसार वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १६.९ टक्के प्रतिसादकर्ते अनुसचित जातीतील असून ३८.१ टक्के प्रतिसादकर्ते अनुसूचित जमातीतील असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १२.७ टक्के, १०.५ टक्के, ७.६ टक्के, ८.४ टक्के अनुक्रमे प्रतिसादकर्ते प्रधानमंत्री आवास योजना लाभार्थी (ग्रामीण), अति मागासवर्गीय (एमबीसी),

अंत्योदय अन्न योजना लाभार्थी (एएवाय), वनवासी गटातील असून ५.७ टक्के उत्तरदाते गरीब कुटुंबांतर्गत नोंदणी केलेले व्यक्ति असल्याचे निदर्शनास आले.

**२. लाभार्थ्यांची शैक्षणिक पात्रता :**

**सारणी क्र. २:** प्रतिसादकर्त्यांचे त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण

| **शैक्षणिक योग्यता** | **लाभार्थ्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| अशिक्षीत | १३४ | १७.९ |
| ५ वी पास | ३८४ | ५१.२ |
| १० वी | १२८ | १७.१ |
| १२ वी | ७१ | ९.५ |
| स्नातक | ३३ | ४.४ |
| अन्य | ० | ०.० |
| **एकूण** | **७५०** | **१००.०** |

काई–वर्गमूल्य:७५३.४०८; स्वातंत्र्यांश: ५; तालिका मूल्य: ११.०७; p मूल्य: <०.०५

**सारणी क्रमांक २** मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा लाभ घेतलेल्या व्यक्तिंचे त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १७.९ टक्के प्रतिसादकर्ते अशिक्षित असून ५१.२ टक्के प्रतिसादकर्ते ५ वी पास असल्याचे निदर्शनास आले. तसेच १७.१ टक्के व ९.५ टक्के प्रतिसादकर्ते १० वी व १२ वी शिक्षित असून ४.४ टक्के प्रतिसादकर्ते स्नातकपर्यंत शिक्षित असल्याचे आढळले.

**३. लाभार्थ्यांचा मुख्य व्यवसाय :**

**सारणी क्रमांक ३:** प्रतिसादकर्त्यांचे मुख्य व्यवसायानुसार वर्गीकरण

| **मुख्य व्यवसाय** | **लाभार्थ्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| मजुरी | ४७६ | ६३.५ |
| धंदा | ७६ | १०.१ |
| नोकरी | ६३ | ८.४ |
| गृहिणी | ५५ | ७.३ |
| कुटीरउद्योग | ३९ | ५.२ |
| अन्य | ४१ | ५.५ |
| **एकूण** | **७५०** | **१००.०** |

काई–वर्गमूल्य:११९०.३८४; स्वातंत्र्यांश: ५; तालिका मूल्य: ११.०७; p मूल्य: <०.०५

**सारणी क्रमांक ३** मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा लाभ घेतलेल्या व्यक्तींचे मुख्य व्यवसायानुसार वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार अध्ययन क्षेत्रातील ६३.५ टक्के प्रतिसादकर्ते मजुरी करीत असून १०.१ टक्के व ८.४ टक्के प्रतिसादकर्ते धंदा व नोकरी करीत असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे ७.३ टक्के प्रतिसादकर्ते गृहिणी तर ५.२ टक्के व ५.५ टक्के प्रतिसादकर्ते कुटीरउद्योग व अन्य व्यवसाय करीत असल्याचे आढळले.

प्रधानमंत्री उज्वला या योजनाचा तुम्ही कधीपासुन लाभ घेतला आहे?

### ४. प्रधानमंत्री उज्वला या योजनेचा लाभ कालावधी :

**सारणी क्रमांक ४:** लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्वला योजनेचा लाभ मिळाल्याचा कालावधी दर्शविणारी सारणी

| **कालावधी** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ वर्षापासुन | ९५ | १२.७ |
| १ ते २ वर्षापासुन | १०९ | १४.५ |
| २ ते ३ वर्षापासुन | २१० | २८.० |
| ३ वर्षाहुन अधिक | ३३६ | ४४.८ |
| **एकूण** | **७५०** | **१००.०** |

काई–वर्गमूल्य:१९८.८११; स्वातंत्र्यांश: ३; तालिका मूल्य: ७.८२; p मूल्य: <०.०५

**सारणी क्रमांक ४** मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्वला योजनेचा लाभासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार अध्ययन क्षेत्रातील १२.७ टक्के लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री उज्वला योजनेचा १ वर्षापासून लाभ घेतला असून १४.५ टक्के लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री उज्वला योजनेचा १ ते २ वर्षापासून लाभ घेतला असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे २८.० टक्के लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री उज्वला योजनेचा २ ते ३ वर्षापासून तर व ४४.८ टक्के लाभार्थ्यांनी ३ वर्षाहुन अधिक वर्षापासून लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आले.

### ५. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेबाबत मार्गदर्शन :

**सारणी क्रमांक ५**: प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेबद्दल मार्गदर्शन करणाऱ्या स्त्रोतासंबंधी माहिती दर्शविणारी सारणी

| **मार्गदर्शन स्त्रोत** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| ग्राम पंचायत | २२८ | ३०.४ |
| पंचायत समिती | २३ | ३.१ |
| शेजारी/नातेवाईक | ७८ | १०.४ |
| टीव्ही, रेडिओ जाहिरात | २९४ | ३९.२ |
| राजकीय कार्यकर्ता | ५५ | ७.३ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ६ | ०.८ |
| तहसील कार्यालय | ३९ | ५.२ |
| गैर शासकिय संस्था | २० | २.७ |
| इतर | ७ | ०.९ |
| **एकूण** | **७५०** | **१००.०** |

काई–वर्गमूल्य:१०५०.८४७; स्वातंत्र्यांश: ८; तालिका मूल्य: १५.५१; p मूल्य: <०.०५

**सारणी क्रमांक ५** मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेबद्दल मार्गदर्शन करणाऱ्या स्त्रोतासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार अध्ययन क्षेत्रातील ३०.४ टक्के व ३.१ टक्के लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेबद्दल ग्राम पंचायत व पंचायत समितीनी मार्गदर्शन केले असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १०.४ टक्के, ३९.२ टक्के, ७.३ टक्के, ०.८ टक्के व ५.२ टक्के लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेबद्दल शेजारी/नातेवाईक, टीव्ही, रेडिओ जाहिरात, राजकीय कार्यकर्ता, जिल्हाधिकारी कार्यालय व तहसील कार्यालयांनी मार्गदर्शन केले तर २.७ टक्के व ०.९ टक्के लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेबद्दल गैर शासकिय संस्थेकडून व इतर स्त्रोतांकडून मार्गदर्शन मिळाले असल्याचे निदर्शनास आले.

### ६. प्रधानमंत्री उज्वला योजनांसंबंधीत समस्या

**सारणी क्रमांक ६:** लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्वला योजनेसंबंधीत माहिती मिळवितांना येणाऱ्या समस्या दर्शविणारी सारणी

| **समस्या** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| शासकीय संस्थांद्वारे मार्गदर्शन मिळत नाही | ३०९ | ४१.२ |
| माहिती अधिकारी कार्यालयात उपस्थित नसतात | २४६ | ३२.८ |
| कर्मचारी माहिती देण्यास टाळाटाळ करतात | १४४ | १९.२ |
| प्रसंगी लाच मागितल्या जाते | ५१ | ६.८ |
| **एकूण** | **७५०** | **१००.०** |

काई–वर्गमूल्य: २०६.४४८; स्वातंत्र्यांश: ३; तालिका मूल्य: ७.८२; p मूल्य: <०.०५

**सारणी क्रमांक ६** मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेसंबंधीत माहिती मिळवितांना येणाऱ्या समस्या दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार अध्ययन क्षेत्रातील ४१.२ टक्के लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्वला योजनेसंबंधीत माहिती मिळवितांना शासकीय संस्थांद्वारे मार्गदर्शन मिळत नसून ३२.८ टक्के लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्वला योजनेसंबंधीत माहिती मिळवितांना माहिती अधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १९.२ टक्के व ६.८ टक्के लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्वला योजनेसंबंधीत माहिती मिळवितांना कर्मचारी माहिती देण्यास टाळाटाळ करतात व प्रसंगी लाच मागितल्या जात असल्याचे निदर्शनास आले.

## निष्कर्ष :

### १. लाभार्थ्यांची जात वर्गवारी :

प्राप्त माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील (चंद्रपुर जिल्ह्यातील) प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचे बहुतांश लाभार्थी अनुसूचित जमातीतील आहेत.

### २. लाभार्थ्यांची शैक्षणिक पात्रता :

प्राप्त माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील (चंद्रपुर जिल्ह्यातील) प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचे बहुतांश लाभार्थी ५ वी पास आहेत.

### ३. लाभार्थ्यांचा मुख्य व्यवसाय :

प्राप्त माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की अध्ययन क्षेत्रातील (चंद्रपुर जिल्ह्यातील) प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचे बहुतांश लाभार्थीच्या मजुरी व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले.

### ४. प्रधानमंत्री उज्वला या योजनेचा लाभासंबंधी :

प्राप्त माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील (चंद्रपुर जिल्ह्यातील) प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचे बहुतांश लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री उज्वला योजनेचा ३ वर्षांहुन अधिक वर्षापासून लाभ घेतला आहे.

### ५. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेबाबत मार्गदर्शन :

प्राप्त माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील (चंद्रपुर जिल्ह्यातील) बहुतांश लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री उज्वला योजनेबद्दल टीव्ही, रेडिओ जाहिरातकडून मार्गदर्शन मिळाले.

## ६. प्रधानमंत्री उज्वला योजनांसंबंधीत समस्या :

प्राप्त माहितीच्या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील (चंद्रपुर जिल्ह्यातील) बहुतांश लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्वला योजनेसंबंधीत माहिती मिळवितांना शासकीय संस्थांद्वारे मार्गदर्शन मिळत नाही.

## आधार ग्रंथ सूची :


- भोळे भा.ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर २००३
- बोधणकर सुधीर, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, २००७
- जरारे विजय, सामाजिक शास्त्रांची संशोधन प्रणाली, अद्वैत प्रकाशन, नागपूर, २००४
- चतुर्वेदी विनायक, ग्रामीण विकास, ग्रिन्स बुक्स (इण्डिया) जयपूर, २०११
- देशमुख अलका, स्थानिक स्वशासन, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१४
- घोडके अमोल, भारतातील मानव संसाधन विकास विशेष संदर्भात, भाग – १ युनिक अकॅडमी, पुणे, २०१३
- Aggarwal, S., Kumar, S and Tiwari, M.K. (2018). Decision support system for Pradhan Mantri Ujjwala Yojana, Energy Policy, 118, pp. 455-461.
- Annampatla, R and Kaur, R. (2016). Welfare Schemes and Administration Programmes for Women In India – A Study, International Journal in Management and Social Science, 4(10), pp. 57-68.
- Bansal, A.A. (2018). Analysis of Government Schemes for Women Employment in India, ITIHAS-The Journal of Indian Management, 8(3), pp. 37-46.
- Joshi, A. (2017). Women and Child Welfare Schemes in India and How Media Can Promote Outreach, International Journal of Current Innovation Research, 3(12), pp. 947-954.
- Kar, A., Singh, D., Pachauri, S., Bailis, R., & Zerriffi, H. (2019). Ujjwala at 6 crores: Impact on Cooking Energy Transition and Climate Change. In: The Ujjwala Saga - Unending Happiness & Health, pp. 16-21
- Sahoo, M. K., Patel, P and Patel, R. (2018). Grassroots Energy Security for India's Poor and Women Empowerment: An Assessment of Pradhan Mantri Ujjwala Yojana, Journal of Governance & Public Policy, 8(2), pp. 18-27.
- Sarker, T.(2013). Women Development and Government Schemes With Special Reference To Ksy, IOSR Journal of Humanities And Social Science, 17(1), pp. 37-41.